Cultural

(38)

रयत शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर

(स्वायत्त)

## मराठी विभाग २०२०-२१


## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा


### मराठी भाषा प्रश्नमंजुषा स्पर्धा अहवाल

मराठी भाषा आणि साहित्याबाबत प्रत्येकी दोन गुणांचे पंचवीस प्रश्न तयार करण्यात आले. गुगल फॉर्मच्या माध्यमातून ही प्रश्नावली सामाजिक माध्यमाद्वारे प्रसारित करण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील विद्यार्थी व प्राध्यापकांनी ह्या प्रश्न मंजुषा स्पर्धेत सहभाग घेतला. त्यांची संख्या जवळपास २०० इतकी आहे. प्रश्नावलीतील पन्नास प्रतिशत प्रश्नाची उत्तरे बरोबर आलेल्या सहभागीना प्रमाणपत्र देण्यात आली. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. कुंडलिक शिंदे, विभाग प्रमुख डॉ. राजाराम राठोड, प्रा. सुभाष कदम, डॉ. रमेश शिंदे व प्रा. राजेंद्र मोरे यांचे सहकार्य लाभले.

समन्वयक
प्रा.डॉ. दत्तात्रय डांगे

प्राचार्य,
कर्मवीर भाऊराव पाटील
महाविद्यालय, पंढरपूर.




समन्वयक

डॉ. दत्तात्रय डांगे

प्राचार्य,

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर.

रयत शिक्षण संस्थेचे
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर. (स्वायत्त)
२०२०-२०२१
मराठी विभाग

दि. २८.०१.२०२१

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त कथा लेखन स्पर्धा
### अहवाल

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कुंडलिक एच. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त मराठी विभागाच्या वतीने १४ जानेवारी २०२१ ते २८ जानेवारी २०२१ या कालावधीत अनेक उपक्रम घेऊन साजरा करण्यात आला. मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी महाविद्यालयात कथा लेखन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत ७ विद्यार्थ्यांनी स्वतः लिहून (PDF) Email, whotsapp द्वारे पाठवून सहभाग नोंदविला. स्पर्धेसाठी खालील विषय देण्यात आले होते.

कथा लेखन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. अमोल मोरे, प्रा. सुहास शिंदे यांनी काम पहिले.

| अ.नं. | शेरा | कथाकाराचे नाव | कथेचा विषय |
|---|---|---|---|
| १. | प्रथम | गिड्डे बाळकृष्ण विष्णू एम.ए.-२ | उतार वयातील ओझं |
| २. | द्वितीय | कु. लाटगावकर प्राची प्रल्हाद एम.ए.-१ | घुसमट |
| ३. | तृतीय | कु. सावंत आश्विनी जोरीराम बी. एस्सी. -३ | तिचं स्वातंत्र्य |

कथा लेखन स्पर्धा संयोजक
(प्रा. सुभाष कदम )

विभाग प्रमुख,
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर. जि. सोलापूर.

प्राचार्य,
कर्मवीर भाऊराव पाटील
महाविद्यालय, पंढरपूर.

रयत शिक्षण संस्थेचे

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर. (स्वायत्त)

२०२०-२०२१

मराठी विभाग दि. २८.०१.२०२१

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त कथा लेखन स्पर्धा - निकाल पत्रक**

| अ. नं. | विद्यार्थ्याचे नाव | कथेचे नाव | परीक्षक १ (१०) | परीक्षक २ (१०) | एकूण (२०) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कु. लाटगावकर प्राची प्रल्हाद एम.ए.-१ | घुसमट | ८ | ९ | १७ | द्वितीय |
| २. | गिड्डे बाळकृष्ण विष्णू एम.ए.-२ | उतार वयातील ओझं | ९ | ९ | १८ | प्रथम |
| ३. | बनसोडे गणेश मारुती एम.ए.-१ | अनुभव | ७ | ७ | १४ | |
| ४. | कु. सावंत आश्विनी जोरीराम बी. एस्सी. -३ | तिचं स्वातंत्र्य | ८ | ८ | १६ | तृतीय |
| ५. | गवळी तानाजी शिवाजी बी.ए.-३ | लॉकडाऊन काळातील शेतकरी | ८ | ७ | १५ | |
| ६. | काटकर गणराज महादेव बी. ए.- १ | पालवी | ६ | ७ | १३ | |
| ७. | कु सपताल शीतल दत्तात्रय बी. ए. १ . | स्वातंत्र्याचे मोल | ५ | ५ | १० | |

**सही**

परीक्षक-१ – प्रा. सुहास शिंदे

परीक्षक-२ – प्रा. अमोल मोरे

कथा लेखन स्पर्धा संयोजक प्रा. सुभाष कदम

विभाग प्रमुख,
... व पदव्युत्तर मराठी विभाग,
... र भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर. जि. सोलापूर.




रयत शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर
## (स्वायत्त)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित

कर्मवीर पथ, पंढरपूर - ४१३ ३०४, जि. सोलापूर (महाराष्ट्र)

स्थापना : १९६०

Jr. College Index No. : J 24.08.0

U-DISE No.: 273008103

☎ ऑफस : (०२१८६) २२३१०४ * E-mail : kbppandharpur@gmail.com * Website : www.kbpmpandharpur.in

संस्थापक : पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील डी.लिट.


| नॅक मानांकन 'A+' सी.जी.पी.ए. : ३.५१ (२०१७ पासून) | डी.एस.टी.-फिस्ट योजना भारत सरकार (२०१३ पासून) | आदर्श महाविद्यालय पारितोषिक पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व रयत शिक्षण संस्था, सातारा (२०१५) | यु.जी.सी. सी.पी.ई. दर्जा (२०१७-१८) | यु.जी.सी. परामर्श योजना (२०१९-२०) |
|---|---|---|---|---|

जा. क्र. ११९३/२०-२१ दिनांक : ०३/०२/२०२१ प्राचार्य डॉ. के. एच्. शिंदे एम्.ए., एम्.फिल., पीएच्.डी.

प्रति,

मा. प्र. कुलसचिव

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय: दि. १४ जानेवारी २०२१ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केल्याबाबत ....**

संदर्भ: जा. क्र. पुअहोसोविसो/कु.का./२०२१/३०८ दि.२१ जानेवारी २०२१

महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार आमच्या महाविद्यालयात दि. १४ जानेवारी २०२१ ते २८ जानेवारी २०२१ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. त्या निमित्त ऑनलाईन कवी संमेलन, पुस्तक परीक्षण, ग्रंथ प्रकाशन सोहळा, काव्यसादरीकरण, ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा, कथालेखन स्पर्धा, ऑनलाईन प्रश्नमंजुषा, भाषा संवर्धन पत्रक या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सोबत छायाचित्रासह अहवाल पाठवत आहोत तरी त्याचा स्वीकार व्हावा, ही विनंती.

कळावे

आपला विश्वासू,

प्राचार्य

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,

पंढरपूर. (स्वायत्त)

सोबत – अहवाल

रयत शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर

(स्वायत्त)

मराठी विभाग २०२०-२१

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अहवाल ( दि. १४ ते २८ जानेवारी २०२१ )

महाराष्ट्र शासन परिपत्रकानुसार व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कुंडलिक शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार मराठी विभागाच्यावतीने दि. १४ ते २८ जानेवारी २०२१ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. त्यावेळी मराठी भाषेचे संवर्धन होण्यासाठी विद्यार्थी,शिक्षक व पालक यांच्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले त्याचा एकत्रित अहवाल पुढीलप्रमाणे.

### ❖ ऑनलाईन कवी संमेलन

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग व महाराष्ट्र साहित्य परिषदेची पंढरपूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दिनांक २०.०१.२०२१ रोजी 'ऑनलाईन कवी संमेलन' संपन्न झाले. या संमेलनात कवी सुनील जवंजाळ, कवी सूर्याजी भोसले, कवी संभाजीराव अडगळे व कवी गणेश गायकवाड यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कुंडलिक शिंदे हे होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मराठी विभाग प्रमुख डॉ. राजाराम राठोड यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमाची रूपरेषा सांगून कवितेचे भाषेतील महत्त्व विषद केले. यावेळी त्यांनी 'अंधारलेली युगे तुम्हीच मुक्त केली, चालुनी अनवाणी वाट, माती मऊसूत केली, टाचातील भेगांना माहित येथील यातना, अण्णा चालून ही धरती, तुम्ही ललामभूत केली' ही स्वरचित कविता सादर केली.

कवी सुनील जवंजाळ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता सादरीकरणाच्या माध्यमातून केले. कवी सूर्याजी भोसले यांनी 'पुस्तक' व 'मुलगी' या कवितांचे सादरीकरण केले. 'आधाराचा वड, काळजाचा घड, सावलीचे झाड, मुलगीच' या कवितेने वातावरण भावूक केले. कवी संभाजी अडगळे यांनी 'घुंगरू' व 'लेक' या कवितांचे सादरीकरण केले. "बापा लेकीचं जगणं, माय माहेरा असणं, देतो काळजाचं घड, मन करून दगड" या कवी संभाजी अडगळे यांच्या कवितेने श्रोत्यांची मने जिंकली. कवी गणेश गायकवाड यांनी 'माणूस होवू या' व 'संस्कार' या कवितांच्या सादरीकरणातून श्रोत्यांची मने जिंकली. त्यांच्या 'दिल्या घरी तू सुखी रहा, असा आईने शब्द दिला म्हणून , ती गिळत राहिली आयुष्यभर, न पचणारा घासही' या कवितेने श्रोत्यांची मने जिंकली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. कुंडलिक शिंदे म्हणाले की, "मराठी ही आपली मातृभाषा असून गेल्या हजारो वर्षापासून ती संतांच्या अभंगातून, पंडितांच्या रचनातून, शाहिरांच्या कवनातून आणि शेतकऱ्यांच्या श्रमगीतातून अव्याहतपणे प्रवास करत आली आहे. जगभर पोहचलेल्या मराठी भाषेने जगातील अनेक क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत. मराठी भाषा ही व्यवहाराच्या

भाषेसोबत ज्ञानभाषा झाली पाहिजे. यासाठी आपण सर्वांनी तिचे संवर्धन केले पाहिजे." या कार्यक्रमात सिनिअर महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व पालक सहभागी झाले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. रमेश शिंदे, डॉ. दत्तात्रय डांगे व सुभाष कदम यांनी परिश्रम घेतले. शेवटी म.सा.प.चे कार्यवाहक कल्याण शिंदे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

❖ **ग्रंथप्रकाशन सोहळा**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने बुधवार. दि. २७/०१/२०२१, स. १०:३० वा. बॅ. पी. जी. पाटील सभागृहात ग्रंथप्रकाशन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरू तथा रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. अशोक भोईटे यांच्या शुभहस्ते प्राचार्य डॉ. कुंडलिक शिंदे लिखित वित्तीय प्रणाली, स्थूल अर्थशास्त्र, वित्तीय पद्धती या तीन पुस्तकाचे आणि अमित भोरकडे लिखित आणि समीक्षा पब्लिकेशन प्रकाशित 'कसे असावे सुंदर अक्षर' या ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. भोईटे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना ग्रंथामुळे मूल्यांचे जतन आणि संवर्धन होते. मराठी भाषा ही प्राचीन काळापासून जनसामान्यांची भाषा म्हणून चालत आली आहे. मराठी भाषा ही ज्ञानाने, विद्वत्तेने व साहित्याने समृद्ध आहे. ग्रंथनिर्मिती मधून मूल्यांची पेरणी होत असते. शिक्षणातून सुसंस्कारित पिढी घडली पाहिजे. घरातील गृहिणी ही खऱ्या अर्थाने अर्थतज्ज्ञ असते. तिचा संसारातील काटकसरीपणा हा भविष्याच्या गुंतवणुकीचा भाग असतो. ज्याला अर्थकारण जमते त्यालाच व्यवहार कळतात, असे प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ. अशोक भोईटे पुढे म्हणाले की, 'सध्या शिक्षणाचे बाजारीकरण मोठ्या प्रमाणात सुरू आहे. शिक्षक आणि प्राध्यापक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालतात. तेथे त्या मुलांना खूप मार्क्स मिळतात. मात्र उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अशी मुले मागे राहतात. मुलांना प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून दिले तर मुले सज्ञान होतात. मराठी साहित्याच्या अभ्यासातून मूल्ये रुजवली जातात. ग्रंथ लेखनाच्या माध्यमातून ह्या मूल्यांची रुजवणूक करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कुंडलिक शिंदे हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणातून मा. प्राचार्य डॉ. कुंडलिक शिंदे यांनी ग्रंथ लेखनामुळे आनंद मिळतो. शिक्षक आणि प्राध्यापकांनी सातत्यपूर्ण अभ्यासातून ग्रंथ लिहिले पाहिजेत. आपल्या ज्ञानाची, अनुभवाची शिदोरी पुढील पिढीकडे दिली पाहिजे. त्यासाठी मातृभाषा ही महत्वपूर्ण भूमिका पार पाडत असते. सध्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे पेव फुटले आहे. त्यातून घडणारी पिढी पाश्चात्य संस्कारात वाढते. त्यामुळे भारतीय प्राचीन संस्कृती पासून समाज दूर जात आहे. त्यामुळे कोव्हीड१९ सारख्या महामारी निर्माण होतात. भारतीय संस्कृतीमधील मानवी मूल्ये ही आदर्श आहेत. ग्रंथ आपल्यावर संस्कार

करतात, असे मत व्यक्त केले. याप्रसंगी समीक्षा पब्लिकेशनचे प्रकाशक प्रवीण भाकरे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. निंबराज तंटक, उपप्राचार्य डॉ. लतिका बागल, उपप्राचार्य चंद्रकांत रासकर, अधिष्ठाता प्रोफेसर डॉ. तानाजी लोखंडे, रुसा समन्वयक डॉ. बजरंग शितोळे, स्वायत्त समन्वयक डॉ. मधूकर जडल, सी. पी. ई. समन्वयक डॉ. समाधान माने, प्रोफेसर डॉ. हणमंत लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजाराम राठोड यांनी तर सूत्रसंचालन प्रा. अमोल मोरे यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार प्रा. सुभाष कदम यांनी मानले.

या कार्यक्रमातून महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी प्रवीण भाकरे यांनी प्रकाशन व्यवसाय सुरु करून गेल्या दोन वर्षात २१० पुस्तकांचे प्रकाशन केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.

### ❖ कविता सादरीकरण

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त 'काव्य सादरीकरण' स्पर्धेचे आयोजन दि. १४ ते २८ जानेवारी २०२१ दरम्यान करण्यात आले होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर आपल्या आवडत्या कवीच्या कवितेचे सादरीकरण ध्वनीचित्रमुद्रित करून व्हाटसअप या समाजमाध्यमाद्वारे मराठी विभागात पाठविले. १२ विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला. या स्पर्धेत प्रथम क्रमांक विशाल शिंदे, द्वितीय क्रमांक शीतल मोरे आणि तृतीय क्रमांक सिद्धी तेंडूलकर यांनी संपादित केला. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. राजाराम राठोड यांच्यासह मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले.

### ❖ कथा लेखन स्पर्धा

मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त मराठी विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी कथा लेखन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत सात विद्यार्थ्यांनी स्वलिखित कथा PDF स्वरुपात ईमेल व व्हाटसअप द्वारे पाठवून सहभाग नोंदविला. त्यामधून परीक्षण करून प्रथम क्रमांक गिड्डे बाळकृष्ण विष्णू एम.ए.-२ (उतार वयातील ओझं) द्वितीय क्रमांक कु. लाटगावकर प्राची प्रल्हाद एम.ए.-१( घुसमट) तर आणि तृतीय क्रमांक कु. सावंत आश्विनी जोरीराम बी. एस्सी. -३ (तिचं स्वातंत्र्य) यांनी संपादन केला. कथा लेखन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. अमोल मोरे, प्रा. सुहास शिंदे यांनी काम पाहिले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. सुभाष कदम यांच्यासह मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले.

### ❖ वक्तृत्व स्पर्धा

मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. या स्पर्धेत ११ विद्यार्थ्यांनी व्हिडीओ पाठवून सहभाग नोंदविला. स्पर्धेसाठी दिलेल्या विषयांवर

सहभाग घेतलेल्या मुलांमध्ये अनुक्रमे प्रथम क्रमांक कु. सावंजी समृद्धी दामोदर बी. एस्सी-२,( लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी), द्वितीय क्रमांक कु. ले हेमा तुकाराम बी. ए.-३ (लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी), तृतीय क्रमांक कसबे शंकर सर्जेराव एम. ए.-१(शिक्षणाचे माध्यम: मातृभाषा), तर उत्तेजनार्थ कु. धडस अमृता हनुमंत एम. ए.-१(लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी) यांनी यश संपादन केले. वक्तृत्व स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. अमोल मोरे, प्रा. सुहास शिंदे यांनी काम पहिले. विषयज्ञान, भाषाशैली आणि सादरीकरण या अनुषंगाने व्हिडीओचे मूल्यमापन केले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. सुभाष कदम यांच्यासह मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले.

### ❖ भाषा संवर्धन पत्रक

मराठी भाषेची महती सांगणारे प्रसार पत्रक तयार करून ते समाज माध्यमातून प्रसारित करण्यात आले. बी.ए.भाग-१, २ व ३ तसेच एम.ए.भाग १ व २ च्या व्हाटसअप ग्रुपवर पाठविण्यात आले. बी.ए.भाग १ (आवश्यक मराठी) मधील १९६, बी.ए.भाग-१ ऐच्छिक मराठी च्या १८७, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ मराठी विभाग ८७ तसेच फेसबुक या समाज माध्यमावर मराठी भाषेचे प्रसार पत्रक प्रसारित केले. त्यास जवळपास १०० पेक्षा अधिक लोकांनी पाहिले.

### ❖ मराठी भाषा प्रश्नमंजुषा स्पर्धा

मराठी भाषा आणि साहित्याबाबत प्रत्येकी दोन गुणांचे पंचवीस प्रश्न तयार करण्यात आले. गुगल फॉर्मच्या माध्यमातून ही प्रश्नावली सामाजिक माध्यमाद्वारे प्रसारित करण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील विद्यार्थी व प्राध्यापकांनी ह्या प्रश्न मंजुषा स्पर्धेत सहभाग घेतला. त्यांची संख्या जवळपास २०० इतकी आहे. प्रश्नावलीतील पन्नास प्रतिशत प्रश्नाची उत्तरे बरोबर आलेल्या सहभागीना प्रमाणपत्र देण्यात आली. या स्पर्धेचे समन्वयक म्हणून डॉ.दत्ता डांगे यांनी काम पहिले तर ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. कुंडलिक शिंदे, विभाग प्रमुख डॉ. राजाराम राठोड, प्रा. सुभाष कदम, डॉ. रमेश शिंदे व प्रा. राजेंद्र मोरे यांचे सहकार्य लाभले.

### ❖ ग्रंथ परीक्षण लेखन स्पर्धा

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त ग्रंथ परीक्षण स्पर्धेचे आयोजन दि. १४ ते २८ जानेवारी २०२१ दरम्यान करण्यात आले होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर आपल्या आवडत्या ग्रंथाचे परीक्षण करून व्हाटसअप या समाजमाध्यमाद्वारे मराठी विभागात पाठविले.

यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या स्पर्धेत प्रथम क्रमांक बालाजी गिड्डे , द्वितीय क्रमांक गायत्री उघडे आणि तृतीय क्रमांक काजल लोखंडे यांनी संपादित केला. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. रमेश शिंदे यांच्यासह मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले.

**विभाग प्रमुख,**
**पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,**
**कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,**
**पंढरपूर. जि. सोलापूर.**

**प्राचार्य,**
**कर्मवीर भाऊराव पाटील**
**महाविद्यालय, पंढरपूर.**

रयत शिक्षण संस्थेचे

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त)

मराठी विभाग व

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा - पंढरपूर


यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित

ऑनलाईन कवी संमेलन


बुधवार, दिनांक २०.०१.२०२१




कवी संमेलनाचे प्रास्ताविक करताना विभागप्रमुख डॉ. राजाराम राठोड




कवी संमेलनाचे सूत्रसंचालन करताना डॉ. रमेश शिंदे



कवितांचे सादरीकरण करताना कवी गणेश गायकवाड



अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. कुंडलिक शिंदे



कवी संमेलनाचे आभार व्यक्त करताना मसपा पंढरपूरचे कार्यवाह श्री. कल्याण शिंदे.

प्राचार्य,
कर्मवीर भाऊराव पाटील

पंढरपूर

**रयत शिक्षण संस्थेचे**

**कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त)**

**मराठी विभाग**


मराठी भाषा संवर्धन पंधरवडा १४ ते २८ जानेवारी २०२१

**ग्रंथप्रकाशन सोहळा**


बुधवार. दि. २७/०१/२०२१, स. १०:३० वा.

*(स्थळ : बॅ. पी. जी. पाटील सभागृह)*


**क्षणचित्रे**





**मा. प्राचार्य डॉ. कुंडलिक शिंदे यांच्या वित्तीय प्रणाली, स्थूल अर्थशास्त्र, वित्तीय पद्धती या तीन ग्रंथांचे प्रकाशन करताना मा. प्राचार्य डॉ. अशोक भोईटे समवेत उपस्थित मान्यवर**





माजी विद्यार्थी प्रवीण भाकरे यांच्या समीक्षा पब्लिकेशनच्या वतीने प्रकाशित ग्रंथांचे प्रकाशन करताना मा. प्राचार्य डॉ. अशोक भोईटे समवेत मा. प्राचार्य डॉ. कुंडलिक शिंदे व उपस्थित मान्यवर




ग्रंथ प्रकाशन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य डॉ. अशोक भोईटे साहेब




ग्रंथ प्रकाशन सोहळा प्रसंगी प्रास्ताविक करताना मराठी विभागप्रमुख डॉ. राजाराम राठोड




ग्रंथ प्रकाशन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य डॉ. अशोक भोईटे साहेब व उपस्थित रसिक श्रोते

**रयत शिक्षण संस्थेचे**

**कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त)**

**मराठी विभाग**

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा (१४ ते २८ जानेवारी २०२१)

**कविता सादरीकरण**

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त 'काव्य सादरीकरण' स्पर्धेचे आयोजन दि. १४ ते २८ जानेवारी २०२१ दरम्यान करण्यात आले होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर आपल्या आवडत्या कवीच्या कवितेचे सादरीकरण ध्वनीचित्रमुद्रित करून व्हाटसअप या समाजमाध्यमाद्वारे मराठी विभागात पाठविले.



Bhosle Meera 6.1.21.mp4



Gandule Samadhan 7.1.21.mp4




Ghodake Sitaram 7.1.21.mp4



Kokare Vaibhav 7.1.21.mp4




Malavadkar Pallavi.mp4



Manu 6.1.21.mp4





More Shital 8.1.21.mp4



Tendulakar Siddhi.aac

मराठी भाषा प्रश्नमंजूषा स्पर्धा फोटोग्राफ









समन्वयक

डॉ. दत्तात्रय डांगे

प्राचार्य,
कर्मवीर भाऊराव पाटील
महाविद्यालय, पंढरपूर.




समन्वयक
प्रा. दत्तात्रय डांगे

विभागप्रमुख,
मराठी विभाग,
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर. जि. सोलापूर.

प्राचार्य,
कर्मवीर भाऊराव पाटील
महाविद्यालय, पंढरपूर.